दै. लोकपत्र दि. 10.03.2025

# जनावरांची वाहतुक करणारे पिकअप टेप्पो बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पकडले

## कारवाईमुळे विस जनावरांना मिळाले जिवदान

**नायगाव/ता.प्रतिनिधी**

नायगाव-देगलुर राज्य महामार्गावरुन अवैधरित्या एका बुलोरो पिकअपमध्ये एकावर एक कोंबून म्हेसी,वगारी व हले असे एकुण एकविस जनावरांची एकावर एक कोबुन वाहतूक करणाऱ्याला विश्व. हिंदु परिषद बजरंग दल गो रक्षक बिलोली देगलुर येथील कार्यकर्त्यांनी पकडून रामतीर्थ पोलिसांच्या ताब्यात दिले.यात एका जनावरांचा मृत्यू झाला आहे.

सदरील घटना दि.९ मार्च रोजी दुपारी एकच्या सुमारास बिलोली तालुक्यातील बिजुर शिवारात घडली असून. कैलास दादाराव बंडगर बिजुरकर व अनिल शिरोळे यांनी सदरील घटनेची तक्रार रामतीर्थ पोलीस ठाण्यात दिली आहे. रात्री उशिरापर्यंत रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या कारवाईमुळे विस जनावरांना जिवदान मिळाले आहे.





नायगाव ते देगलुर महामार्गावरील बिजुर गावा जवळ दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास बुलोरो पिकअप क्रमांक एमएच २६ बी. इ. १०१२ मध्ये अवैधरित्या एकावर एक कोंबून वगारी म्हैसी व हले असे एकूण एकविस जनावरे भरुन हयगय व निष्काळजीपणे वाहतुन करीत असतांना मिळुन आले आहे.

विश्व हिंदु परिषद बजरंग दल बिलोली तालुका सह मंत्री कैलास दादाराव बंडगर बिजुरकर व देगलूर येथील गो रक्षक आनिल शिरोळे यांनी या वाहनचालकाला बिजुर शिवारात थांबवुन रामतीर्थ पोलिस ठाण्यात कर्मचाऱ्यांना महिती दिली.

रामतीर्थ पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व सदरील टेप्पो बिजुर जवळील पेट्रोल पंप येथे आणुन त्या टोप्पो तील जनावरे बाहेर काढले असता एकविस जनावरे होती त्यातील एक जनावरांचा मृत्यू झाला तर अन्य जनावरांना जखम झाली असल्याचे कैलास दादाराव बंडगर बिजुरकर यांनी सांगितले. यात्प्रकरणी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरा पर्यंत सुरू होती. या कारवाईमुळे एकविस जनावरांना जिवदान मिळाले आहे.